# प्लास्टिक कचरा कमी करण्याच्या फ्लिपकार्टच्या प्रयत्नांना वेग

- स्वत:च्या पुरवठा साखळीत प्लास्टिकचा वापर ५० टक्क्यांनी कमी करण्यात यश
- महाराष्ट्रात संपूर्णपणे पेपर वापरून पॅकेजिंग करण्यास सुरुवात

**बंगळुरु - ८ मे २०२० :** संपूर्णत: भारतात विकसित झालेल्या ई कॉमर्स बाजारपेठ असलेल्या फ्लिपकार्टने आपल्या पुरवठा साखळीत शाश्वत पॅकेजिंग साधने वापरण्यास आणि परिसंस्थेचा नव्याने आढवा घेण्यास सुरुवात केली आहे. शून्य कचरा या उद्‌दिष्टांतर्गत कंपनीने आपल्या पुरवठा साखळीत प्लास्टिकचा वापर कमी करण्यात यश मिळवत स्वत:च्या पुरवठा साखळीत प्लास्टिक पॅकेजिंगचा वापर सुमारे ५० टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. महाराष्ट्रातील आपल्या पुरवठा साखळीत आता त्यांनी टप्प्याटप्प्याने प्लास्टिक वापर बंद करत आणला आहे. १ मे २०२० पासून त्यांनी कागदाचा वापर करून पॅकेजिंग करण्यास सुरुवात केली आहे.

शाश्वत विकासाच्या या मार्गावर कंपनीने अनेक उपक्रम सुरू केले आहेत. यात पर्यावरणस्नेही कागदाचे तुकडे वापरणं, पॉली पाऊचेसच्या जागी पुनर्वापर केलेल्या कागदाच्या पिशव्यांचा वापर, बबल रॅप आणि एअरबॅग्स ऐवजी टाकाऊ खोक्यांचे तुकडे वापरणं आणि २ प्लाय रोलचा वापर अशा अनेक बाबींचा समावेश आहे.

महाराष्ट्रात फ्लिपकार्टच्या पुरवठा साखळीतील शाश्वत पॅकेजिंगमध्ये प्लास्टिक सिक्युरिटी बॅगऐवजी कागदापासून बनलेल्या सिक्युरिटी एन्व्हलप्सचा वापर केला जात आहे. तसेच, सर्व फिलर्स आणि रॅपिंग फिल्म्सऐवजी आता पुनर्वापर केलेल्या कागदापासून बनलेल्या कुशनिंग मटेरिअलचा वापर केला जात आहे.

फ्लिपकार्ट देशभरातील राज्य सरकारांसोबतच सर्व धोरणकर्ते आणि या परिसंस्थेतील इतर भागधारकांच्या साथीने यावर काम करत आहे. आपल्या लाखो विक्रेत्या भागीदारांना हळुहळू परवडणाऱ्या दरातील, अधिक पुरवठा होऊ शकतील अशी आणि व्यापक प्रमाणात उपलब्ध असणारी पॅकेजिंगची शाश्वत साधने वापरण्याकडे कसे वळवावे आणि यासाठी अनुकूल आणि व्यवहार्य मार्ग कसे उपलब्ध करून द्यावे, यावर विचार केला जात आहे. फ्लिपकार्ट देशभरातील दोन लाखांहून अधिक स्थानिक विक्रेत्यांसोबत काम करत आहे. यातील बहुतांश एमएसएमई स्वरुपातील आहेत. यातील अनेक जण ग्राहकांना थेट ऑर्डर पाठवतात आणि स्वत: पॅकेजिंगबद्‌दल निर्णय घेतात.

**फ्लिपकार्ट समूहाचे मुख्य कंपनी व्यवहार अधिकारी रजनीश कुमार** म्हणाले, "फ्लिपकार्ट पर्यावरणीय शाश्वततेला बांधिल आहे आणि दीर्घकालीन शाश्वतता उपक्रम राबवण्यात, पर्यावरणासंबंधी जागरुकता वाढण्यासाठी ते विविध भागीदारांसोबत सक्रिय आहेत. आता आणि भविष्यात परिणाम दिसावेत यासाठी

विविध पॅकेजिंग संकल्पना मांडण्यात, त्यांचा वेध घेण्यात आम्ही आमच्या पुरवठा साखळीत केलेल्या प्रगतीबद्दल आम्हाला आनंद आहे."

आपल्या व्यवसाय आणि मूल्य साखळीत शाश्वत पद्धतींना चालना देण्यास फ्लिपकार्ट बांधिल आहे आणि त्यासाठी त्यांनी पर्यावरण शाश्वतता आणि सामाजिक भान या दोन्ही मुद्द्यांवर भर दिला आहे. फ्लिपकार्टच्या व्यापक पर्यावरणीय शाश्वतता प्रयत्नांमध्ये शेवटच्या टप्प्यातील डिलिव्हरी नेटवर्कमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश करणे, स्रोतांची परिणामकारकता आणि पुनर्वापरातील स्रोत वापरणे, कचरा व्यवस्थापन आणि कचरा कमी करणे यांचा समावेश आहे. तसेच, त्यांना धोरणात्मक सुविधांसाठी ISO 14001 हे प्रमाणपत्र मिळाले आहे. कामाच्या ठिकाणी पर्यावरणीय प्रदूषण टाळण्यासाठीची सज्जता अधोरेखित करणारे हे महत्त्वाचे प्रमाणपत्र आहे.

**About Flipkart**

The Flipkart Group is one of India’s leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India’s e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India’s fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

**For media queries, contact media@flipkart.com**